# मुंबई विद्यापीठ

क्र. एएफएफ/आयसीसी/२०१७-१८/ ४

# परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व ३ आणि ५ वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रम राबविणा-या सर्व अशासकिय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, मुंबई विद्यापीठ लॉ ॲकेडमी, विद्यापीठाचे ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयाबाबतचे शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिनांक २० मे, २०१७ रोजीच्या संदर्भिय पत्रानुसार असे कळविले आहे की, महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या संदर्भिय शासन निर्णयानुसार विधी अभ्यासक्रमाच्या प्रती तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमतेमध्ये एकसमानता आणण्यासाठी दिनांक २८ एप्रिल, १९९७ च्या शासन निर्णयातील विधी महाविद्यालयांच्या प्रत्येक तुकडीत जास्तीत जास्त ८० विद्यार्थी असावेत ही तरतूद संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करून सन २०१७-१८ पासून राज्यातील सर्व पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी ६० विद्यार्थी करण्यात आली आहे.

तरी संबंधित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठाचे संचालक/समन्वयक यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सर्व ३ आणि ५ वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी ६० विद्यार्थी करावी व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

मुंबई-४०० ०३२
6 जून, २०१७

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

प्रति,

विद्यापीठ संलग्नित सर्व विधी अशासकिय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, मुंबई विद्यापीठ लॉ ॲकेडमी, विद्यापीठाचे ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in, E-Mail :mavi.dhepune@gov.in

फोन नं..020/26122119, 26051512, 26130627, 26124639 फॅक्स नं.020/26111153

क्र.अमवि-२०१७/विधी/प्रवेशक्षमता/मवि-२ / ६९७९ दि.२०/०५/२०१७

DAP/ZCO/2017-18/44

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

**विषय- राज्यातील सर्व विधी अभ्यासक्रमांसाठी प्रति तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमता निश्चित करण्याबाबत.**
**संदर्भ-शासन निर्णय क्र.विधी-२०१६/प्र.क्र.२४१/मशि-२, दि.१७/५/२०१७**

उपरोक्त विषयाबाबतचा संदर्भाधीन शासन निर्णय यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. विधी अभ्यासक्रमांच्या प्रती तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमतेमध्ये एकसमानता आणण्यासाठी दि.२८/४/१९९७ च्या शासन निर्णयातील विधी महाविद्यालयांच्या प्रत्येक तुकडीत जास्तीत जास्त ८० विद्यार्थी असावेत ही तरतुद संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करुन सन २०१७-१८ पासून राज्यातील सर्व विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता प्रती तुकडी ६० विद्यार्थी करण्यात आली आहे. तरी याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित विधी महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

(डॉ.वि.रा.मोरे)
शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत-
१. मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

राज्यातील सर्व विधी अभ्यासक्रमांसाठी
प्रति तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमता निश्चित
करण्याबाबत.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
17 MAY 2017
आवक क्रमांकः- 90364
शाखाः- मशि 2

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः विधी-२०१६/प्र.क्र.२४१/मशि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १७ मे, २०१७.

**वाचा:-** उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बैठक १०९६/विधी महा/ (५३९/९६)/मशि-३, दि.२८.०४.१९९७.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अंतर्गत ३/५ वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यानुसार सन २०१६-१७ साठी सदर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या मार्फत सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेने राबविण्यात आली आहे. सदर प्रवेश प्रक्रिया राबविताना विधी महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेची नोंदणी करताना, काही महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ८० विद्यार्थी प्रति तुकडी, तर काही महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ६० विद्यार्थी प्रति तुकडी अशी नोंदविण्यात आली होती. सदर प्रवेश क्षमतेच्या तफावतीमुळे सन २०१६-१७ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचणी निर्माण झाल्याने, यापुढे विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रति तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमतेमध्ये एकसमानता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सदंर्भाधीन दिनांक २८.०४.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील "विधी महाविद्यालयाच्या प्रत्येक तुकडीत जास्तीत जास्त ८० विद्यार्थी असावेत" ही तरतुद या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे. सन २०१७-१८ पासून, राज्यातील सर्व विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रति तुकडी ६० विद्यार्थी अशी राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५१७१५५४३४१५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
Date: 2017.05.17 16:51:24 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. अध्यक्ष, लिगल एज्युकेशन समिती, बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली,
२. कुलगुरु, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई,नागपूर.

४. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१,
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. सर्व राहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
७. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
८. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई,
९. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित विधी महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
१०. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
११. मा. राज्यमंत्री (उच्च वतंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
१२. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती/मशि-२.